सत्यमेव जयते

दस्तावेज क्र. ६१

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

**Maharashtra Water Resources Regulatory Authority**

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)

क्रमांक : मजनिप्रा/२०१८/विधिविषयक/प्रकरण क्र ४ (२०१९)/४६७ दि. ११/०६/२०१९

**२०१८–१९ च्या रबी हंगामासाठी मोटसावंगा लघु सिंचन प्रकल्पाच्या कालव्यातुन पाणी सोडण्यावर जे निवेदन याचिकाकर्ते गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे मार्फत अध्यक्ष गोविंद बाबा पाणी वापर संस्था, तिंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम यांनी दिले त्यावर स्वाधिकारे कार्यवाही करणेबाबत.**

यासोबत दि. ०६/०५/२०१९ चा मजनिप्रा आदेश जोडला आहे.

सहपत्र:– वरील प्रमाणे

स्वाक्षरित
(आर. एम. चव्हाण)
सचिव

प्रति: माहिती व कार्यवाही करिता

१. अध्यक्ष, गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम....... याचिकाकर्ता
२. मुख्य अभियंता, (विनिर्दिष्ट प्रकल्प) ज. सं. विभाग, सिंचन भवन, शिवाजी नगर, अमरावती, ४४४६०२....प्रतिवादी क्र. १
३. अधिक्षक अभियंता, वाशिम सिंचन मंडळ, सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५.... प्रतिवादी क्र. २

9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

४. कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग, (बांधकाम) सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०

..... प्रतिवादी क्र. ३

५. तहसिलदार, मंगरुळपीर, जि. वाशिम

६. अध्यक्ष गोविंद बाबा पाणी वापर संस्था, तिंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम



9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005
Tel.: + 91-22-2215 2019 E_mail : mwrra@mwrra.in Website : www.mwrra.org

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authoirty Established u/s 3 of Maharashtra
Water Resources Regulatory Authority Act, 2005)

---

**आदेश क्रमांक : ६/२०१९**

**२०१८–१९ च्या रबी हंगामासाठी मोटसावंगा लघु सिंचन प्रकल्पाच्या कालव्यातुन पाणी सोडण्यावर जे निवेदन याचिकाकर्ते गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम यांचे मार्फत अध्यक्ष गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम यांनी दिले त्यावर स्वाधिकारे कार्यवाही करणेबाबत. प्र. क्र. ४/२०१९.**

**१.** अध्यक्ष, गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम....... **याचिकाकर्ता**

विरुध्द

१. मुख्य अभियंता, (विनिर्दिष्ट प्रकल्प) ज. सं. विभाग, सिंचन भवन, शिवाजी नगर, अमरावती, ४४४६०२

२. अधिक्षक अभियंता, वाशिम सिंचन मंडळ, सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५

३. कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग, (बांधकाम) सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५

......... **प्रतिवादी**

**कोरम :– श्री. व्ही. एम. कुळकर्णी, अध्यक्षीय सदस्य,**

**(ज. सं. अभियांत्रिकी)**

**श्री. व्ही. जे. तिवारी, सदस्य, (विधी)**

**डॉ. एस. टी. सांगळे, सदस्य (इकॉनामिक्स)**

## पार्श्वभूमि

१) अध्यक्ष, गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम यांनी प्राधिकरणाला एक निवेदन दि. ०२/०१/२०१९ ला दिले; ज्यामधे त्यांनी प्रतिवादींना मोटसावंगा, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम या लघुसिंचन प्रकल्पाच्या कालव्यातुन वर्ष २०१८–१९ च्या रबी हंगामासाठी पाणी सोडण्याचे निर्देश द्यावेत; त्याचप्रमाणे कालव्यात त्यांनी या हंगामात पाणी न सोडल्यामुळे जी हानी झाली त्याबद्दल त्यांनी मोबदला द्यावा, अशी प्रार्थना त्यांच्या निवेदनात केली.

२) प्राधिकरणाने याचिकाकर्त्याच्या या याचिकेवर विचार केला आणि प्राधिकरणााला मजनिप्रा कामकाज चालवण्याचे नियमनाच्या (कलम) नियमन ११ (१) अन्वये जे अधिकार प्रदान केले आहे; त्यानुसार कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाने निर्णय स्वधिकारे घेतला, कारण हे प्रकरण गोविंद बाबा पाणी वापर संस्थेच्या (याचिकाकर्ते) शेतकऱ्यांचे हिताचे आहे.

३) प्राधिकरणाने या अर्जावर कांही निर्णय घेण्यापुर्वी नियमनाच्या कलम ११ (४) नुसार सर्व संबंधितांना यावर त्यांचे उत्तर सादर करावे म्हणुन नोटीस पाठवले; व हे प्रकरण सुनावणी करता ठेवले.

## प्राधिकरणासमोर चाललेले कामकाज

४) या विषयी प्राधिकरणाने पहिली सुनावणी ०७/०३/२०१९ ला आणि दुसरी तथा अंतिम सुनावणी ०६/०५/२०१९ ला घेतली.

## ७ मार्च २०१९ ला घेतलेल्या सुनावणीचा संक्षिप्त गोषवारा

५) प्राधिकरणाने दि. ७ मार्च २०१९ ला सुनावणी घेतली. ज्यामधे याचिकाकर्ते व प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची भरपूर संधी देण्यात आली.

या सुनावणीला खाली दिल्याप्रमाणे संबंधित पक्षकार हजर होते.

१) श्री. आत्माराम के. आखरे – अध्यक्ष, गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम ...... याचिकाकर्ते

२) श्री. प्रमोद जी. मंदाडे – अधिक्षक अभियंता, वाशिम सिंचन मंडळ, सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५ .... प्रतिवादी क्र.२

३) श्री. प्रशांत व्ही. बोरसे – कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग (बांधकाम) सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५ .... प्रतिवादी क्र.३

६) सुनावणीच्या प्रारंभी, याचिकाकर्त्यांनी युक्तिवाद केला की ते पाणी वापरकर्ता संस्थेचे सदस्य असुन ही संस्था महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) चे अंतर्गत पंजीकृत झाली असुन तिला २०१२–१३ पासून मोटसावंगा लघु सिंचन प्रकल्प, मोटसावांगा मधुन पाणी मिळत आहे. ही संस्था स्थापन होणच्या पुर्वी सुध्दा पाण्याचा पुरवठा वर्ष १९९८–९९ पासुन होत आहे. पाणी वापर कर्त्यांनी वर्ष २०१८–१९ प्रतिवाद्यांना कालव्यातुन पाणी सोडण्याविषयी विचारले. त्याला प्रतिसाद म्हणुन प्रतिवादी क्र. ३ ने पाणी सोडण्याचे मान्य केले. प्रतिवादी क्र. ३ नी दिलेल्या आश्वासनानंतर, शेतकऱ्यांनी त्यांचे शेत पेरणीसाठी तयार केले. तथापि, प्रतिवादी पाणी सोडण्यात अयशस्वी ठाले. याचिकाकर्त्यांनी पुढे सांगितले की, कांही असामाजिक तत्व कालव्यात पाणी सोडण्यास अडथळा आणुन राहीले. याचिकाकर्त्यांनी सांगितले की त्यांनी खरीप हंगाम गमावला असुन, रबी हंगामात पाणी सोडण्यासाठी प्रार्थना केली आहे.

७) सुनावणीच्या वेळी प्रतिवादी क्र. ३ कार्यकारी अभियंता, वाशिम सिचंन विभाग यांनी उत्तरासाठी शपथपत्र दाखल केले. युक्तिवादाच्या वेळी प्रतिवादी क्र. ३ नी मान्य केले की, त्यांना याचिकर्त्यांचा दि. १४ नोव्हेंबर २०१८ चा अर्ज कालव्यात पाणी सोडण्याबाबत मिळाला. त्यांनी कालव्याद्वारे पाणी सोडण्याचा देखील प्रयत्न केला पण जलाशयाच्या वरच्या प्रवाहाच्या बाजुला असलेल्या शेतकऱ्यांनी खालच्या बाजुच्या लाभार्थी साठी पाणी सोडण्यास प्रखर विरोध केला. त्यांनी यासाठी पोलीस संरक्षण मागितले होते, याकडे प्राधिकरणाचे लक्ष वेधुन सांगितले की तरी ते कालव्यातुन पाणी सोडु शकले नाही. त्यांनी वरच्या प्रवाहातील लाभार्थींना आपला मुद्दा पटवुन देण्याचा प्रयत्न केला; पण ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. याउलट, त्यांनी धमकी दिली की जर कालव्यातुन खालच्या प्रवाहातील शेतकऱ्यांसाठी पाणी सोडले तर ते जलाशयात उडी घेऊन आत्महत्या करतील. प्रतिवादी क्र. ३ नी पाणी वापर कर्त्यांशीी जो करार झाला त्याची प्रत दिली.

८) प्राधिकरणाला आढळुन आले की याचिकाकर्ते पाणी वापरकर्ता संस्थेचे सदस्य असुन ही संस्था महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) चे अंतर्गत पंजीकृत झाली, प्राधिकरणाला असेही आढळुन आले की वरच्या प्रवाहात रेखांकित केलेल्या भागात व्यक्तिगत उपस्याने सिंचन होत असुन, धरणाच्या खालच्या भागात कालव्याने पाणी दिले जाते. वरच्या प्रवाहाच्या बाजुला असलेल्या गावकऱ्यांच्या दबावामुळे प्रतिवादी खालच्या बाजुच्या शेतकऱ्यांसाठी पाणी सोडत नाही, त्यामुळे खालच्या बाजुचे लाभार्थी त्यांचा पाणी हक्कापासून वंचित राहतात.

त्यामुळे प्राधिकरणाने सांगितले की प्रतिवादींचे कालव्यातुन पाणी सोडणे हे त्यांचे कर्तव्य आहे, त्यामुळे त्यांना निर्देश दिले की, जे लोक कालव्यातुन पाणी सोडण्याच्या कामात अडथळा निर्माण करतात त्यांच्या विरुध्द पोलिस स्टेशन मधे गुन्हा दाखल करावा.

९) प्रतिवादी क्र. २ व ३ यांना त्यांची जबाबदारी मान्य आहे आणि त्यांनी आश्वासित केले की, पुढच्या ४—५ दिवसात ते पाणी कालव्यातुन उपलब्ध करुन देतील. प्रतिवादी क्र. ३ कार्यकारी अभियंता यांनी प्राधिकरणाचे लक्ष वेधले की पाण्याचे बिलाची बरीच रक्कम जमा केलेली नाही. याचिकाकर्त्यांनी सुनावणीचे वेळी मान्य केली की बिलाची बाकी लाभार्थीकडुन गोळा केली जाईल व पाणी सोडल्यावर ४ दिवसाचे आत प्रतिवादींना बिलाची रक्कम अदा केली जाईल.

१०) पक्षकारांनी केलेला युक्तिवाद विचारात घेवून, व समोर असलेल्या कागदपत्रांवरुन, प्राधिकरणाने खालील प्रमाणे अंतरिम निर्देश जारी केले.

**१) प्रतिवादी कायदेशीर असलेला पाण्याचा कोटा कालव्यातुन ४ दिवसांच्या आत सोडतील. पाणी वापर संस्था पाण्याचे वितरण त्यांच्या सदस्यांमधे करतील. प्रतिवादी जे पाणी सोडण्यासाठी अडथळा निर्माण करुन राहीले त्यांचे विरुध्द एफ. आय. आर. दाखल करतील.**

**२) पाणी वापर संस्था कालव्यातुन पाणी सोडल्यानंतर ४ दिवसांचे आत पाण्याची बाकी असलेली पाणी बील जमा करतील.**

**०६/०५/२०१९ ला घेतलेल्या अंतिम सुनावणीचा संक्षिप्त गोषवारा:—**

११) दुसरी व अंतिम सुनावणी प्राधिकरणाने दि. ०६/०५/२०१९ ला घेतली ज्यामधे याचिकाकर्ते व प्रतिवादींना त्यांचे म्हणणे मांडण्याची भरपूर संधी देण्यात आली. या सुनावणीला खाली दिल्याप्रमाणे संबंधित पक्षकार हजर होते.

१) श्री. आत्माराम के. आखरे — अघ्यक्ष, गोविंद बाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम .......याचिकाकर्ता

२) श्री. प्रमोद जी. मंदाडे — अधिक्षक अभियंता, वाशिम सिंचन मंडळ, सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५ .... प्रतिवादी क्र.२

३) श्री. प्रशांत व्ही. बोरसे — कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग (बांधकाम)
सिव्हील लाईन, वाशिम, ४४४५०५ .... प्रतिवादी क्र.३

१२) कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग, वाशिम प्रतिवादी क्र. ३ यांनी कालव्यातुन खालच्या प्रवाहातील बाजुच्या लाभार्थींसाठी पाणी सोडण्याबाबत अनुपालना शपथपत्र दि. ०६/०५/२०१९ चे दाखल केले. त्याची प्रत याचिकाकर्त्याला सुध्दा देण्यात आली.

१३) प्रतिवादी क्र. २ यांनी सांगितले की मागच्या दि. ७ मार्च २०१९ च्या सुनावणीच्या वेळेस प्राधिकरणाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे, प्रतिवादी क्र. ३ यांनी लाभार्थींना भेटून त्याच दिवशी ११/०३/२०१९ ला कालव्यातुन खालच्या प्रवाहातील लाभार्थीसाठी पाणी सोडण्याचा कार्यक्रम पक्का करण्यासाठी सभा घेतली. परंतु या सभेला वरच्या प्रवाहातील लाभार्थींनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे पोलीस संरक्षण मागण्यात आले. त्यावेळी पोलीस लोकसभेच्या निवडणुकीच्या कामात व्यस्त असल्याने ते या कामासाठी येऊ शकले नाही. त्यावेळी दि. २१/०३/२०१९ ला याचिकाकर्त्यांनी प्रतिवादींना कळवले की त्यांच्या साठी ६ एप्रिल नंतर पाणी कालव्यातुन सोडण्यात यावे. प्रतिवादी क्र. ३ नी कळविले की पाणी वापर संस्थेने पाण्याचे जुने बील जमा केले नाही.

१४) याचिकाकर्त्याने सांगितले की त्यांना पाणी मिळाले असुन त्यांनी १५ हेक्टर सिंचन केले. आणि त्यांनी सांगितले की त्याच्या व्यथेचे परिमार्जन झाले असुन त्यानी प्रतिवादी व प्राधिकरण यांनी केलेल्या कार्यवाही बद्दल समाधान व्यक्त केले.

१५) प्राधिकरणाने याचिकाकर्त्यांना निर्देश दिले की, त्यांनी कालव्याची पुर्ण लांबीमधे सफाई करावी ज्यायोगे पाणी कालव्याच्या पुच्छ टोकाला पोहचेल, तसेच त्यांनी आता झालेल्या आवर्तनाचे पुर्ण बील व कांही राहीलेली बाकी ताबडतोब जमा करावी. याचिकाकर्त्यांनी सांगितले की प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांचे ते पालन करतील.

१६) प्रतिवादींनी सांगितले की सध्या जलाशयात १.३० दलघमी पाणी उपलब्ध आहे. यापैकी ०.६८ दलघमी पाणी मंगरुळपीर नगर पालिकेसाठी त्याच्या वर्षा अखेरच्या भागातील गरजेसाठी राखुन ठेवले आहे, आणि ०.६२ दलघमी पाणी सिंचनासाठी उपलब्ध आहे. प्रतिवादी क्र. ३ नी पुढे सांगितले की त्यांनी ०.०९ दलघमी पाणी, पाणी वापर संस्थेसाठी कालव्यातुन सोडले व त्यांनी १५ हेक्टर क्षेत्र सिंचित केले.

## सत्यस्थिति

१७. या वादातील पक्षकारांचे युक्तिवाद ऐकल्यावर, अभिलेखात असलेली कागदपत्रे पाहुन, प्राधिकरणाला या प्रकरणाची जी वस्तुस्थिती आढळुन आली ती अशी आहे.

१) मोटसावंगा लघुसिंचन प्रकल्प मंगरुळपीर तालुक्यात वाशिम जिल्हयात मदन नदीवर १९७५ मधे बांधला आहे; सिंचनासाठी पाणी १९७६ मधे उपलब्ध करुन दिले.

२) गोविंदबाबा पाणी वापर संस्था निंबी ही महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम, २००५ व त्याचे नियम यामधे असलेल्या तरतुदीप्रमाणे १६/१०/२००८ ला स्थापित झाली. पाणी वापर संस्थेचे रेखांकन केलेल क्षेत्र ८६४ हेक्टर असुन त्यापैकी ३७. ६० हेक्टर क्षेत्रामधे जलाशयाच्या उपस्या (लिफ्ट) द्वारे सिंचन होते. याचिकाकर्त्या पाणी वापर संस्थेने प्रतिवादी क्र. ३ बरोबर १९/११/२०११ ला करारावर सहया केल्या आहेत. आणि वर्ष २०१२–१३ पासुन पाण्याचे व्यवस्थापन या संस्थेला सोपवले आहे.

३) मोटसावंगा जलाशयाची चल साठवणीची क्षमता ४.५९ दलघमी असुन त्यापैकी १.१६ दलघमी मंगरुळपीर पेयजलाची गरज भागवण्यासाठी आरक्षित आहे; तर सिंचनासाठी ३. ४३ दलघमी पाणी उपलब्ध आहेत, ज्यामधे बाष्पीभवन हानी समाविष्ट आहे.

४) वर्ष २०१८–१९ मधे जलाशय पुर्ण भरले होते; ज्यापैकी १.४० दलघमी मंगरुळपीर नगर परिषदे च्या पेय जलासाठी आरक्षित होते.

५) सप्टेंबर २०१८ मधे प्रकल्प क्षेत्रात कमी पाउस झाल्यामुळे, २७१ हेक्टर खरीप पिक जलाशयाच्या उपस्याने सिंचित केले होते. बाष्पीभवनाच्या हानीचा विचार करता, रबी हंगमासाठी ३.६८ दलघमी पाणी सिंचनासाठी उपलब्ध होते.

६) याचिकाकर्त्या पाणी वापर संस्थेने प्रतिवादी क्र. ३ ला १६/११/२०१८ च्या अर्जान्वये रबी हंगामासाठी (२०१८ च्या) कालव्यातुन पाणी सोडण्याची विनंती केली.

७) याचिकाकर्त्याचे १४/११/२०१८ चे मिळाल्यावर प्रतिवादी क्र. ३ नी १६/११/२०१८ ला कालव्यातुन पाणी सोडण्याची व्यवस्था केली. परंतु जलाशयाच्या वरच्या प्रवाहाच्या बाजुला असलेल्या शेतकऱ्यांनी खालच्या बाजुच्या लाभार्थी साठी पाणी सोडण्यास प्रखर विरोध केला. क्षेत्रातील एकुण परिस्थिति पाहिल्यावर कालव्यातुन पाणी सोडण्याचा प्रयत्न सोडुन द्यावा लागला.

८) त्यानंतर प्रतिवादी क्र. ३ त्या स्थळांवर संरक्षण मिळावे पोलिस स्टेशन ला आणि मंगरुळपीर च्या तहसिलदारांना या कामात मदत व सहकार्य मिळावी म्हणुन, त्यांना विनंती केली. पोलिस इन्सपेक्टरने लाभार्थींची सभा २९ नोव्हेंबर ला या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी घेतली. परंतु या सभेत कालव्यातुन पाणी खालच्या भागातील लाभार्थींसाठी सोडण्यावर काही निर्णय झाला नाही.

९) कालवा अधिकाऱ्यांनी सुध्दा गावकऱ्यांची सभा घेवून सांगितले की जलाशयात किती पाणी उपलब्ध आहे, बिगर सिंचन आरक्षणाबद्दल व बाष्पीभवनाची माहिती देवून सिंचनासाठी किती पाणी शिल्लक आहे याची जाणीव करुन दिली तरी पण प्रवाहाच्या वरच्या लाभार्थींनी कालव्यातुन पाणी खालच्या भागातील लाभार्थींसाठी सोडण्यावर विरोध केला. एवढेच नाहीतर, वरच्या प्रवाहातील लाभार्थींनी धमकी दिली की जर कालव्यातुन खालच्या प्रवाहातील शेतकऱ्यांसाठी पाणी सोडले तर ते जलाशयात उडी घेऊन आत्महत्या करतील.

१०) कालवा अधिकाऱ्यांनी तहसिलदार, मंगरुळपीर यांचेकडे दि. २६ नोव्हेंबर च्या पत्राने विनंती केली की त्यांनी या कामासाठी सहकार्य करावे व कालव्यातुन पाणी सोडण्यात मदत करावी.

११) कालवा अधिकाऱ्यांनी आसेगाव पोलिसांची यासाठी संरक्षण मिळावे म्हंणुन मदत घेतली. आसेगावच्या पोलीस इन्सपेक्टर ने मोटसावंगा, रामगाव, दुधखेडा व निंबी गावांच्या ग्रामस्थांची सभा घेतली; सोबत ज. सं. विभागाचे अधिकारी देखील होते आणि सहमती होऊ शकली नाही.

१२) १७/१२/२०१८ ला तहसिलदार मंगरुळपीर, प्रतिवादी क्र.३ व उपविभागीय पोलिस अधिकारी, त्यांच्या १०–१२ पोलिसांसह या मुद्यांवर तोडगा काढण्यासाठी स्थळावर गेलेत. परंतु शेतकऱ्यांनी  कालव्यातुन पाणी खालच्या भागातील लाभार्थींसाठी सोडण्यास विरोध केला. शेतकरी मोठया संख्येने विरोध करण्यास तेथे जमल्याचे पाहून, त्या सर्वांनी निर्णय घेऊन कालव्यातुन पाणी सोडण्याचे कार्य रहित केले.

१३) शेवटी, दि. ८ एप्रिल २०१९ मधे पाणी सोडण्यात आले, एकुण ३ दिवस पाणी सोडले ज्याची मात्र ०.०९ दलघमी होती.

१४) याचिकाकर्त्याने त्याच्या दि. ८ एप्रिल २०१८ च्या पत्राने पाणी मिळालेचे मान्य केले व अशाप्रकारे त्यांची तक्रार दुर करण्यात आली.

१५) सुनावणीचे वेळेस याचिकाकर्त्याने त्याची व्यथा दुर झाल्याचे सांगुन प्रकरण बंद करण्याची विनंती केली.

१६) अशाप्रकारे पाणी वापर संस्थेच्या सदस्यांमधे या प्रकरणात झालेला अंतर्गत वाद समाधानकारक रितीने, प्राधिकरणाने प्रकरणात वेळीच लक्ष घातल्यामुळे दुर झाला.

१७) तथापि, असे आढळले की वरच्या प्रवाहातील शेतकरी त्याच्या व्यक्तिगत उपस्याने शक्य तेवढे पाणी अवैध पध्दतीने वापरत आहे ज्या योगे खालच्या प्रवाहातील शेतकऱ्यांना कालव्यातुन पाणी घेण्याचा कायदेशीर हक्कापासून वंचित राहावे लागते.

१८) असे देखील आढळुन आले की प्रतिवादी व याचिकाकर्ते पाणी वापर संस्था दोघेही त्यांचा हक्क व जबाबदारी बद्दल जागरुक नाहीत.

१९) असे देखील आढळुन आले की याचिकाकर्ता पाणी वापर संस्था /संस्थेने त्यांच्याकडे थकित असलेल्या रु. ६४,८०० चा भरणा केलेला नाही.

## मुद्दे साचेबध्द करणे

१८. प्राधिकरणाने या प्रकरणाचा विचार करुन, पक्षकारांनी सादर केलेले म्हणणे विचारात घेऊन तसेच प्रकरणाची सत्य स्थिति, उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन, जाणुन घेतल्यानंतर खालील मुद्दे विचारार्थ घेतले.

**१. याचिकाकर्त्यासाठी कालव्यातुन पाणी सोडण्याबद्दल प्रतिवादी जबाबदार आहेत काय?**

**२. प्रतिवादी किंवा क्षेत्रातील त्यांच्या कर्मचाऱ्यांनी कालव्यातुन पाणी सोडण्याबद्दल निष्काळजीपणा केला आहे काय?**

**३. प्रवाहाच्या खालच्या भागातील लाभार्थींना न्याय मिळावा म्हणुन त्यांना सरळपणे कालव्यातुन पाणी मिळण्याबद्दल जे प्रश्न/मुद्दे निर्माण झालेत, त्याबद्दल कांही विनिर्दिष्ट निर्देश देणे गरजेचे आहे काय?**

## प्राधिकरणाचे निष्कर्ष

**१९. वर दिलेल्या मुद्यांवर प्राधिकरणाने काढलेले निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

**१) याचिकाकर्त्यासाठी कालव्यातुन पाणी सोडण्याबद्दल प्रतिवादी जबाबदार आहेत काय?**

याचिकाकर्ते पाणी वापरकर्ता संस्थेचे सदस्य असुन ही संस्था महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) चे अंतर्गत पंजीकृत झाली. प्रतिवादी क्र. ३ आणि पाणी वापर संस्था यांनी याबाबत दि. १९/०१/२०११ ला केलेल्या करारपत्रांवर सहया केल्या. महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम २८ (१) व ५३ (डी) अन्वये जेवढा पाण्याचा हक्क आहे तेवढे पाणी संस्थेला उपलब्ध करुन देणे ही प्रतिवादीची कायदेशीर जबाबदारी आहे. त्या कलमातील तरतुद अशी आहे.

**“ २८ (१) पाणी वापर संस्थांना देय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार घनमापन पध्दतीने विहित रीतीने पाणी पुरवठा करणे ही, समुचित प्राधिकरणाची जबाबदारी असेल.”**

**“५३ (डी) सर्व स्तरावरील पाणी वापर संस्थांना, प्रत्येक वर्षाला, मान्य केलेल्या मध्यंतरानंतर घनमापना नुसार योजलेल्या घाऊक प्रमाणावर, अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार पाणी पुरवठा केला जातो याची सुनिश्चित करणे.”**

पुढे म्हणजे महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडुन व्यवस्थापन नियम २००६ च्या नियम १८ मधे दिलेल्या तरतूदीप्रमाणे, ही कालवा अधिकाऱ्याची जबाबदारी आहे की पाणी वापर संस्थेच्या सदस्याला त्यांच्या अनुज्ञेय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार त्यांनी पाणी देण्याची सुनिश्चिती करणे.

यामुळे या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.

**२) प्रतिवादी किंवा क्षेत्रातील त्यांच्या कर्मचाऱ्यांनी कालव्यातुन पाणी सोडण्याबद्दल निष्काळजीपणा केला आहे काय?**

महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम २८ (१) नुसार पाणी वापर संस्थांना देय हक्काच्या पाण्याच्या प्रमाणानुसार घनमापन पध्दतीने विहित रीतीने पाणी पुरवठा करणे ही प्रतिवादींची जबाबदारी आहे.

वर दिलेली जी सत्यस्थिती अनुच्छेद १७ (८) ते १७ (९) मधे दर्शविली आहे, त्याप्रमाणे प्रतिवादी व त्यांच्या क्षेत्र कर्मचाऱ्यांनी कालव्यातुन पाणी सोडण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले.

तथापि, प्रतिवादींने अशा लोकांविरुध्द कार्यवाही करणे गरजेचे होते त्यांनी महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडुन व्यवस्थापन अधिनियम ६० ची अंमलबजावणी करण्यामधे अडथळा आणला. प्रतिवादी यामधे अयशस्वी झाले. तथापि, हे हेतुपूर्वक केल्याचे दिसुन येत नाही.

या मुद्याचे उत्तर नकारार्थी येते.

**३) प्रवाहाच्या खालच्या भागातील लाभार्थींना न्याय मिळावा म्हणुन त्यांना सरळपणे कालव्यातुन पाणी मिळण्याबद्दल जे प्रश्न/मुद्दे निर्माण झालेत, त्याबद्दल कांही विनिर्दिष्ट निर्देश देणे गरजेचे आहे काय?**

या प्रकरणाचे कामकाज चालु असतांना प्राधिकरणाला आढळुन आले की;

अ) वाशिम हा सिंचनाचा अनुशेष असलेला जिल्हा आहे, तसेच हा जिल्हा आत्महत्या प्रवण देखील आहे. राज्यशासनाने या जिल्हयात सिंचनाच्या सोयी सुविधा वाढाव्यात/निर्माण व्हाव्या म्हणुन बरीच गुंतवणुक केली आहे. आता गरज आहे ती जी सिंचन संभावना निर्माण झाली त्याचा वास्तविक रित्या वापर करण्याची तथा उपलब्ध पाण्याचे समन्यायी वितरण करण्याची सुनिश्चिती करणे; ज्या करिता मजनिप्रा अधिनियम, २००५ मधे व महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) मधे असलेल्या तरतुदींचे पालन करण्याची आवश्यकता आहे.

असे आढळुन आले की, मोटसावंगा प्रकल्पामधे (ता. मंगरुळपीर, जि. वाशिम) कांही लोक बेकायदेशीर पणे सिंचनाच्या वेळापत्रकात व कायदेशीर पाणी वितरणाच्या कामात अडथळा आणतात.

अशा परिस्थितिला सामोरे जाण्यासाठी राज्य शासनाने कायदे केले आहेत. तथापि, असे दिसुन आले आहे की, प्रतिवादींनी या तरतुदींचा वापर केला नाही; शक्य आहे या कायदेशीर तरतूदी माहित नसल्यामुळे तसे असेल. प्रतिवादी ज. सं. विभागांचे अधिकारी व कायदा सुव्यवस्था राखणारे मंगरुळपीर तालुका जि. वाशिम चे अधिकारी यांनी कालव्यातुन पाणी सोडण्याचे कामात त्वरित कार्यवाही करणे आवश्यक होते, ज्यामुळे सिंचनाचे दिलेले वेळापत्रक पाळुन कायद्याप्रमाणे असणारे याचिकाकर्त्याचे पाणी वापर संस्थेला मिळाले असते. प्रतिवादींने अशा लोकांविरुध्द कार्यवाही करणे गरजेचे होते ज्यांनी महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्याकडुन व्यवस्थापन अधिनियम ६० ची अंमलबजावणी करण्यामधे अडथळा आणला.

ब) प्रतिवादी व त्याचे हाताखाली असलेले कालवा अधिकारी यांची त्यांना असलेल्या अधिकारांची क्षमता बांधणी, महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन, व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधे दिलेले उद्देश पुर्ण करण्यासाठी, आवश्यक आहे.

क) याचिकाकर्ता पाणी वापरसंस्था त्यांचे काम जे महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन, व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधे दिलेले आहे, म्हणजे कालवा यंत्रणेची, हंगाम सुरु होण्याआधी, देखभाल करणे, संस्थेच्या सदस्यांकडुन सेवा शुल्क गोळा करुन तो पैसा कालवा अधिकाऱ्यांकडे जमा करणे तसेच सदस्यांमधे झालेला वाद मिटवणे, इ. करण्यात अपयशी ठरले.

ड) त्यांचे काम व्यवस्थित व परिणामकतेन करता यावे पाणी वापर संस्थांची क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. यासाठी कालवा अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक ती तांत्रिक व व्यवस्थापकिय सहायता द्यावी.

इ) महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ५, ६ व ७ निर्गमित केलेल्या अधिसुचना ३ मधे पाणी वापर संस्थेचे रेखांकन केलेल क्षेत्र ८६४

हेक्टर असुन त्यापैकी ३७.६० हेक्टर क्षेत्रामधे जलाशयाच्या उपस्या (लिफ्ट) द्वारे सिंचन होते. त्याउलट कालवा क्षेत्र ६७८.९५ हेक्टरचे आहे. जी कागदपत्रे प्रकरणात जोडली आहे, त्यावरुन दिसुन येते की, पाण्याचा मोठा हिस्सा निमज्जनातुन पाणी घेणारे शेतकरी व्यक्तिगत उपस्यांचा वापर करुन वापरतात तर कालव्यावर असणाऱ्या शेतकऱ्यांसाठी फारच कमी पाणी उपलब्ध होते.

वर्ष २०१८–१९ मधे प्रतिवादींने शपथपत्राद्वारे सादर केले की, २७१ हेक्टर खरीप पिक जलाशयाच्या उपस्याने सिंचित केले होते. याउलट कालव्याद्वारे रबी हंगामात फक्त १५ हेक्टर जमिनीससाठी पाणी सोडण्यात आले. अशाप्रकारे, जे पाणी दिले ते विहित हक्काप्रमाणे दिलेले नाही. हा प्रकार बंद व्हायला पाहिजे.

प्राधिकरणाने वर जी निरिक्षणे दिली आहेत त्यावरुन त्यांचे असे मत आहे की, कांही विनिर्दिष्ट निर्देश, याचिकाकर्ता पाणी वापर संस्थेला कायम न्याय मिळण्याची सुनिश्‍चिती व्हावी. तसेच महाराष्ट्र सिंचन पध्दतीने शेतकऱ्यांकडुन, व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधे दिलेले व मजनिप्रा अधिनियम, २००५ मधील कायदेशीर तरतुदी पुर्ण व्हाव्यात, याकरिता देणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे या मुद्याचे उत्तर होकारार्थी येते.

## अंतिम आदेश/निर्देश

२०. याचिकाकर्त्याने कामकाज सुरु असतांना प्राधिकरणाला सांगितले की त्यांना आवश्यक तो अनुतोष प्राप्त झाला असुन न्याय मिळाल्याने ते समाधानी आहे. याचिकाकर्त्यांच्या या निवेदनानंतर, याचिका खाली दिलेले निर्देश देऊन जे निष्कर्ष प्राधिकरणाने अनुच्छेद १९ मधे दिले आहे तसेच पाणी वापर संस्थेच्या सदस्यांचे व्यापक हित लक्षात घेऊन निकालात काढली आहे. याबराबरच महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) मधे दिलेल्या तरतूदींचे पालन होणे देखील आवश्यक आहे.

**अ) अधिक्षक अभियंता, वाशीम सिंचन मंडळ, वाशिम प्रतिवादी क्र. २ यांचेसाठी निर्देश याप्रमाणे खाली दिले आहेत.**

प्रतिवादी क्र. ३ व त्यांचे हाताखाली काम करणाऱ्यांची क्षमता बांधणी करण्यासाठी त्वरित पाउले उचलावीत.

**ब) कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग, वाशिम प्रतिवादी क्र. ३ यांचेसाठी निर्देश याप्रमाणे खाली दिले आहेत.**

१) याचिकाकर्ता पाणी वापर संस्था याना त्यांच्या विहित पाणी वापराच्या हक्काप्रमाणे पाण्याचा हिस्सा दिला आहे याची सुनिश्चित करावी.

२) वरच्या प्रवाहातील जलाशयातुन जास्त अथवा अवैध अप्राधिकृत पाण्याच्या वापरावर प्रतिबंध लावावे.

३) जे लोक प्रतिवादींना महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) चे अंतर्गत कलम ६० अन्वये सिंचनाचे वेळापत्रक पाळण्यास प्रतिबंध करतात त्यांना सचेत करावे व त्यानंतर, गरज भासल्यास, त्या कलमाखाली त्यांच्या विरुध्द कार्यवाही करावी, ज्याद्वारे कालव्याच्या लाभार्थींना त्यांचा कायदेशीर हक्काच्या पाण्याचा हिस्सा प्राप्त होईल.

४) पाणी वापरकर्ता संस्थाना महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडुन व्यवस्थापन अधिनियम २००५ (MMISF) चे कलम ५३ (१) अंतर्गत अनिवार्य असलेले सर्व तांत्रिक व व्यवस्थापकिय सहाय्य द्यावे.

५) कालव्याचे दुरुस्तीचे काम हाती घ्यावे ज्यायोगे मोटसावंगा लघु सिंचन तलावाची रचित (डीजाईन्ड) पाणी जाण्याची क्षमता पुर्ववत होईल; म्हणजे पुच्छ टोकाकडे असणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा पाण्याचा हिस्सा बरोबर मिळत राहील. हे काम शासनाच्या

ज्या योजना आहेत, जशा मनरेगा, कालवा स्वच्छता अभियान, ई. त्यांना एकत्रित करुन, त्या मार्फत करावे.

**क) तहसिलदार तथा निम्न श्रेणी कार्यकारी दंडाधिकारी, मंगरुळपीर, जिल्हा वाशिम;**

कार्यकारी अभियंता, वाशिम सिंचन विभाग, वाशिम व त्यांच्या क्षेत्रातील अधिकाऱ्यांना, तालुका स्तरावर, जर सिंचनाच्या वेळापत्रकात व शेतकऱ्यांना व पाणी वापर संस्थांना, ज्यांना अधिनियम २००५ (MMISF) चे अंतर्गत पाण्याचे हक्क दिले आहेत, त्यांच्या पाणी पुरवठा करण्याच्या अंमलबजावणी करण्याच्या कामात बेकायदेशीर पणे अडथळा आणत असतील तर, ते सर्व आवश्यक मदत त्वरेने करतील.

**ड) अध्यक्ष, गोविंदबाबा पाणी वापर संस्था, निंबी, ता. मंगरुळपीर, जि. वाशीम;**

पाणी वापरकर्ता संस्थेला अधिनियम २००५ (MMISF) चे अंतर्गत कलम ५२ अन्वये जी कालवा यंत्रणेची हंगाम सुरु होण्याआधी देखभाल करण्याविषयी जबाबदारी दिली आहे त्याचे पालन करतील आणि तसेच त्यांच्या सदस्यांकडुन पाण्याचे बिलाचे पैसे गोळा करुन कालवा अधिकाऱ्यांकडे जमा करतील.

याचिका त्याप्रमाणे, खर्चाचा उल्लेख न करता निकालात काढली आहे.

अनुपालनेचे पुनर्विलोकनाची तारीख : ११ फेब्रुवारी २०२०

११ जुन २०१९ ला जारी केले

स्वा.
एस. टी. सांगळे
सदस्य (ईकॉनॉमिक्स)

स्वा.
विनोद जे. तिवारी
सदस्य, (विधि)

स्वा.
व्ही. एम. कुळकर्णी
अध्यक्षीय सदस्य (ज. सं. अभियांत्रिकी)